महाराष्ट्र शासन
वन विभाग
मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), अमरावती कॅम्प, अमरावती - ४४४६०२
दुरध्वनी क्र. (०७२१) २६६२०९०/२६६२५९३/२६६२६८०, (वैयक्तिक) फॅक्सक्र.- २६६३३१४
ई-मेल : aticcfa@gmail.com / ccftamravati@mahaforest.gov.in/ हॅलो फॉरेस्ट (नि:शुल्क) १९२६

आदेश क्रमांक 149 | अमरावती, दिनांक 9/10/2024

विषय:- लेखापाल संवर्गातून मुख्य लेखापाल संवर्गात पदोन्नती देणेबाबत.

संदर्भ :- १.सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक:बीसीसी २०१८/प्र.क्र.३६६/१६-ब, दिनांक ०७ मे २०२१

२.नागरी सेवा मंडळाची सभा दिनांक ०९/१०/२०२४.

लेखापाल पदावरून मुख्य लेखापाल पदावर खुल्या प्रवर्गात तात्पुरती पदोन्नती देण्याकरिता विभागीय पदोन्नती समितीची बैठक दिनांक ०९/१०/२०२४ रोजी संपन्न होऊन विभागीय पदोन्नती समितीच्या सभेत पदोन्नतीस पात्र ठरविण्यांत आलेल्या खालील लेखापाल यांचे दिनांक ०९/१०/२०२४ रोजी पार पडलेल्या सभेत नागरी सेवा मंडळाने पदस्थापनेच्या बाबतीत केलेल्या शिफारशीस अनुसरुन मुख्य लेखापाल या पदावर खुल्या प्रवर्गात तात्पुरते पदोन्नतीचे आदेश खालील अटीच्या अधिन राहुन निर्गमित करण्यांत येत आहे.

१.०० लेखापाल या संवर्गातून मुख्य लेखापाल संवर्गात सुधारित वेतन संरचनेनुसार वेतन स्तर (एस-१३: ३५४००-११२४००) या वेतनमानात लेखापाल या पदावर खाली नमुद केलेल्या अटीवर **निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात** पदोन्नती देण्यात येत आहे.

१.०१ आपणास देण्यात येणारी पदोन्नती ही सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक:बीसीसी २०१८/प्र.क्र.३६६/१६-ब, दिनांक ०७ मे २०२१ च्या निर्णयाच्या अधिन राहून देण्यांत येत असून उक्त पदोन्नत्ती निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात मा.सर्वोच्च न्यायालयाच्या विशेष अनुमती याचिका क्रमांक २८३०६/२०१७ वरील अंतिम निर्णयाच्या अधिन असतील. तसेच सदर पदोन्नती मुख्य लेखापाल संवर्गातील काही दावे/याचिका दाखल केल्या/झाल्या असल्यास सदर प्रलंबित याचिकांच्या अंतिम निर्णयाचे अधिन राहतील.

१.०२ आपणास देण्यात येणारी पदोन्नती सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक-दिव्यांग २०२२/प्र.क्र.८३/१६-अ दिनांक २०/०४/२०२३ व सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक दिव्यांग २०२२/प्र.क्र.८३/१६-अ दिनांक २९/०७/२०२४ मधील दिव्यांग आरक्षण विचारात घेवून व सदर प्रकरणी सहाय्यक आयुक्त मागाससवर्ग कक्ष, अमरावती विभाग यांचे कडे प्रतिक्षेत असलेल्या अमरावती वनवृत्ताचे दिव्यांग बिंदुनामावली भविष्यात प्रमाणीत झाल्यावर मागाससवर्गीय कक्षाकडून दिलेल्या निर्देशानूसार कार्यवाही करण्याचे अटीवर तसेच दिव्यांग आरक्षणाबाबत शासनाकडून/वरिष्ठ कार्यालयाकडून प्राप्त होणा-या निर्देशाप्रमाणे कार्यवाही करण्याचे अटीवर तात्पुरत्या स्वरुपात देण्यात येत आहे.

१.०३ मुख्य लेखापाल संवर्गाच्या सर्व सेवा शर्ती आपणास बंधनकारक राहतील.

१.०४ सदर पदोन्नती निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात असल्याने या तात्पुरत्या पदोन्नतीच्या परिणामी निवडसूचीतील कर्मचाऱ्यांना नियमितपणाचा व सेवाजेष्ठतेचा कोणताही हक्क मिळणार नाही.

१.०५ आपणास देण्यांत आलेली तात्पूरती पदोन्नती कोणतीही पुर्व सुचना वा नोटीस न देता रद्य करण्याचा अधिकार शासन राखून ठेवीत आहे.

१.०६ या आदेशाद्वारे पदोन्नतीने पदस्थापना दिलेल्या ठिकाणी रूजू तारखेला पदोन्नतीचे पदावर वेतन निश्चिती करण्यात येईल.

१.०७ महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक वशिअ-१२१४/प्र.क्र.२६/११ दिनांक ०२ जुन २०१४ अन्वये पदोन्नती करिता मत्ता व दायित्व याची वार्षिक विवरणपत्र सादर करणे अनिवार्य आहे.

१.०८ शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांक एसआरव्ही-१०१५/प्र.क्र.-१/६५/१२ दिनांक ०८/जुन/१९९५ अन्वये कालबध्द पदोन्नती व शासन निर्णय क्रमांक वेतन-१९९९/प्र.क्र.-२/९२/सेवा-३ दिनांक २० जुलै २००१ अन्वये आश्वासित प्रगती योजना शासकीय कर्मचा-यांना लागु करण्यांत आली आहे. तसेच शासन वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक वेतन-१११९/प्र.क्र.३/२०१९/सेवा-३, दिनांक ०२/०३/२०१९ अन्वये

सातव्या वेतन आयोगामध्ये, तीन लाभांच्या सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योनजेच्या अनुज्ञेयतेनुसार, १० वर्षाच्या नियमित सेवेनंतरची सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ शासकिय कर्मच्या-यांना मंजुर करण्यांत आला आहे. या योजने अंतर्गत ज्या कर्मचा-यांनी कालबध्द पदोन्नतीचा व आश्वासित प्रगती योजनेचा लाभ घेतलेला आहे, अशा कर्मचा-यांनी पदोन्नती नाकारल्यास त्यांना देण्यात आलेला कालबध्द पदोन्नतीचा किंवा आश्वासित प्रगती योजनेचा लाभ काढून घेण्यात येईल.

२.०० आपणास वरील नमूद अटी व शर्तीचे अधिन राहून खुल्या प्रवर्गात **निव्वळ तात्पुरत्या** पदोन्नती नंतरचे मुख्य लेखापाल या पदावर पदस्थापना खालील प्रमाणे देण्यात येत आहे.

| अ.क्र. | कर्मचा-यांचे नांव (सर्वश्री) | लेखापाल पदावरील नियुक्ती प्रवर्ग | सध्या कार्यरत असलेला विभाग | पदोन्नत मुख्य लेखापाल पदाचा प्रवर्ग | पदोन्नती नंतर पदस्थापनेचे ठिकाण | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | मुकेश ईश्वरलाल सुर्यवंशी | खुला (दिव्यांग) | वनसंरक्षक सामाजिक वनीकरण विभाग अमरावती | खुला (दिव्यांग) | मुख्य लेखापाल, विभागीय कार्यालय, गुगामल वन्यजीव विभाग चिखलदरा | रिक्त पदावर |

३.०० आपणास उपरोक्त सर्व अटी व शर्ती मान्य असल्याचे संमतीपत्र पदस्थापनेच्या ठिकाणी रुजू होतांना सादर करावे.

४.०० सदर आदेश तात्काळ प्रभावाने अंमलात येतील.

५.०० पदोन्नती पदस्थापना ही संपूर्णपणे प्रशासकीय स्वरुपाची बाब असल्यामुळे कोणत्याही कर्मचा-याने पदस्थापनेच्या ठिकाणामध्ये बदल करणेबाबत राजकीय दबाव वापरल्यास त्यांनी महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ मधील नियम २३ चा भंग केला म्हणून ती कृती शिस्तभंगाच्या कारवाईस पात्र राहील.

Jayoti Banerjee

(जयोती बॅनर्जी)
मुख्य वनसंरक्षक
(प्रादेशिक) अमरावती

क्रमांकः-कक्ष-८/आस्था/मु.ले.पदो./2171/२०२४-२५
अमरावती-२, दिनांकः- 9.10.2024

प्रति,

श्री.मुकेश इश्वरलाल सुर्यवंशी, लेखापाल
वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण अमरावती कार्यालय

प्रतिलीपीः- अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन दुय्यम संवर्ग) म.रा.नागपूर यांना माहितीस सविनय सादर.

प्रतिलीपीः- वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, मेळघाट व्याघ्र प्रकल्प,अमरावती यांना माहीतीस अग्रेषित

प्रतिलीपीः- वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण, अमरावती यांना माहीती व आवश्यक कार्यवाही करीता अग्रेषित.

प्रतिलीपीः- उपवनसंरक्षक, गुगामल वन्यजीव विभाग, चिखलदरा यांना माहीती करीता अग्रेषित.

प्रतिलीपीः- "आदेश फाईल"